
# कोरोना महामारी व समाज



- संपादक -
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.वाकणकर जी.बी.
डॉ.टेंगसे एस.ए.

# अनुक्रमनिका

1. कोरोना महामारी व मराठी भाषा
सखाराम बाबाराव कदम..... 1

2. कोरोनाचा क्रीडा क्षेत्रावरील परिणाम
डॉ पवन प्रकाशराव.पाटील..... 7

3. कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. कविता मोराडे..... 11

4. कोरोनाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम.
डॉ विठ्ठल रामकिशन भोसले..... 15

5. कोविड 19 एक महामारी.
प्रा डॉ.अशोक डी चव्हाण..... 26

6. कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम
टेंगसे सुनिता आत्माराव, गांगर्डे गोपाळ मदन .... 35

7. कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था
प्रा. डॉ. अंभुरे एस.डी..... 43

8. कोविड -19 चा भारताच्या कृषी क्षेत्र वरील परिणाम
विश्लेषणात्मक अभ्यास
डॉ. बी. आर. शिंदे.... 49

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# कोरोना महामारी व मराठी भाषा

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रा.सखाराम बाबाराव कदम**
मराठी विभाग,
कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनपेठ जि. परभणी.

*****

Covid-19 च्या विषाणूने बघता बघता जागतिक अवकाश व्यापला. संपूर्ण मानवजातीसमोर जिवंत राहणे हेच आव्हान बनले. कोरोनाने प्रत्येकाच्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली. या प्रत्यक्ष बदला सोबतच प्रत्येक भाषेमध्ये कोरोना मुळे काही भाषिक बदल होत गेल्याचे दिसून येते. या बदलाला जी भाषा सामावून घेऊ शकेल तीच भाषा टिकेल. प्रत्येकाला वाटेल की कोरोना महामारी चा व स्थानिक भाषा मराठी चा काय संबंध? लेखाचे शीर्षक वाचल्यावर सुद्धा असा प्रश्न पडू शकतो. यासाठी प्रस्तुत शोध लेखाच्या सुरुवातीलाच काही खुलासे करणे महत्त्वाचे ठरते. कोरोनामुळे माणसा माणसातल्या नात्यापासून ते देशोदेशीच्या आंतरराष्ट्रीय संबंध पर्यंत अनेक पडझडी, समीकरणे बदलली आहेत. कौटुंबिक व रक्तातील नात्यात पडझड दिसून येत आहे. व्यापार, शिक्षण, खरेदी-विक्री, आपापसातील बैठका, कार्यक्रम... इत्यादीसाठी घरातील माणसे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जगाशी अप्रत्यक्ष संवाद साधत आहेत. अनेक भेटी बैठका

Late Ramesh Warpudkar ACS
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist Parbhani



ऑनलाईन माध्यमातून संपन्न होत आहेत.पर्यायाने प्रत्येक भाषेला या नव्या विज्ञान व तंत्रज्ञानाला समाविष्ट करून घेणारा आपला भाषिक अवकाश विस्तारत नेत परभाषेतील अनेक शब्दांचा भरणा करणे आवश्यक ठरताना दिसून येत आहे. माणसाच्या आयुष्याची जगण्याची दिशा जशी बदलेल तसा हा भाषाव्यवहार ही बदलणार आहे.

समजा जर भविष्यात शाळांमध्ये ऑनलाइन वर्ग भरणार असतील तर आपणास विविध प्रकारचे ऑनलाईन साहित्य निर्माण करावे लागेल. फक्त पाठ्यपुस्तके पीडीएफ करून हे भागणार नाही. डिजिटल माध्यमासाठी मातृभाषेतून मजकूर (कन्टेन्ट) तयार करावा लागेल. हा मजकूर केवळ शब्द रुपात नसेल तर तो मल्टिमीडिया, खेळ या स्वरुपात असेल. हा मजकूर जी भाषा तयार करू शकेल तीच या ऑनलाईन माध्यमात लोकप्रिय ठरेल. जी लोकप्रिय ठरेल तिच्यातून आपल्या मुलांना शिकविण्याचा कल वाढेल. म्हणूनच मराठी सारख्या भाषांनी या नव्या माध्यम पासून लांब न पळता या माध्यमाच्या गरजा समजून घेऊन त्यादिशेने काम करायला हवे.

**कोरोना काळात घडून आलेले बदल**

**१) वर्क फ्रॉम होम:** हा कोरोनामुळे दिसणारा प्रमुख दृश्य बदल आहे. आजवर कधीही केले गेले नाही अशी घरून काम करण्याची वेळ आज अनेकांवर आली आहे. हा बदल तात्पुरता नसून हीच कार्यपद्धती कायम करता येईल का? याचा जागतिक पातळीवर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

विचार होतो आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) सारख्या कंपन्यांनी 2025 पर्यंत आपले 75 टक्के कर्मचारी घरून कसे काम करतील या दिशेने कामही सुरू केले आहे. जगभरात हे आज होत आहे.

**२) लर्न फ्रॉम होम:** हा कोरोना मुळे दिसून येणारा दुसरा दृश्य बदल. अनेक शाळा महाविद्यालये यांनी मागील वर्षभर आपल्या अध्ययन व अध्यापन साठी 'शाळा महाविद्यालये बंद पण शिक्षण सुरू' हा उपक्रम राबवून विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर वर्गअध्यापनाचे काटेकोर आयोजन व नियोजन केले. त्यासाठी गुगल मीट, झूम, युट्यूब व्हिडिओ लिंक, लाईव्ह स्ट्रीमिंग आदेि प्रगत साधनांचा वापर केला जात आहे. याशिवाय फेसबुक लाईव्ह, व्हाट्सअप ग्रुप या समाज माध्यम यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे सर्वतोपरी प्रयत्न शिक्षक प्राध्यापक वर्गाकडून होत आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने इथून पुढे उच्च शिक्षणासाठी 40% अभ्यासक्रम ऑनलाइन माध्यमातून शिकवण्याचा विचार बोलून दाखवला आहे. त्यासाठी स्वयम् प्लॅटफॉर्मवर भारत सरकार कडून अनेक कमी कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच विविध ज्ञानशाखा मधील कोर्स तयार केलेले दिसून येतात.एकूणच लर्न फ्रॉम होम मुळे मराठी भाषेच्या भाषिक रूपावर हा बदलाचा ठसा उमटत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

आज सारे जग डिजिटलायझेशन च्या दिशेने जात असताना आपण त्यात मागे पडून चालणार नाही.डिजिटल पेमेंट, ऑनलाइन बँकिंग सारख्या अर्थ व्यवहारातही भारतीय भाषांचे किमान स्थान दृढ करणे गरजेचे आहे. तरच माहितीफलकापासून संगणकापर्यंत कोणत्याही प्रकारे भाषा एक माध्यम म्हणून प्रभावी बनवता येईल. हा प्रयोग सर्वच भारतीय भाषांमध्ये कमी अधिक प्रमाणात होत आहे.

**कोरोना काळाने भाषिकदृष्ट्या काय शिकवले?**

१) डिजिटल कन्टेन्ट निर्मिती करणे:- सकस डिजिटल कन्टेन्ट तयार करणे हे काम वैयक्तिक व व्यावसायिक स्तरावर लोक डाऊन मुळे होत आहे. पण या पलीकडे जाऊन एक भाषा म्हणून भाषेसंदर्भातील विविध संकल्पना, त्या त्या भाषेचे सांस्कृतिक संदर्भ इतर भाषिक समूहांना आकलन होईल असा डिजिटल मजकूर आपणास तयार करावा लागेल.

२) नवे शब्द रूढ करणे:-भाषिक गरज जेव्हा असते तेव्हा नवे शब्द रूढ करण्याचे काम माध्यमे आणि समाज माध्यमे वेळोवेळा करत असतात. पण त्यावर लक्ष देऊन त्यांच्या योग्य-अयोग्य तेची चर्चा व्हायला हवी. भाषिक शब्दकोश, व्युत्पत्ती कोश, संज्ञा संकल्पना कोश अशी कोशनिर्मिती सातत्याने सकते ने आणि डिजिटल स्वरूपात व्हायला पाहिजे.इंग्रजी किंवा अन्य भाषेतील शब्द स्वीकारायचा असेल तरी तो मोकळेपणाने स्वीकारायला हवा.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

३) डिजिटल रिसोर्सेस तयार करणे:- मराठी भाषेतून आज उपलब्ध असलेला मराठी विकिपीडिया ह्या मुक्त कोशांमध्ये एक साचलेपण आले आहे. हे मराठी डिजिटल कोश नव्या संकल्पना स्वीकारताना दिसत नाहीत. ही सारी खुंटलेली प्रक्रिया आपणास पुन्हा गतिमान करावी लागेल.

४) भाषा शिकण्याचे मल्टिमीडिया कोर्सेस तयार करणे:- मराठी आणि मराठीच्या सर्व बोलीभाषा शिकण्यासाठी किंवा त्यातील मजा अनुभवण्यासाठी फार काही मल्टिमिडीया रिसोर्स उपलब्ध नाहीत.ही कमतरता भरून काढताना अनेकानेक मल्टीमीडिया कोर्सेस तयार करून मराठी भाषा शिकणे व शिकवणे अधिक सुलभ करता येईल.

५) ई - मराठी शाळा:- आज चांद्यापासून बांद्यापर्यंत च्या महाराष्ट्रात, पानिपत पासून तंजावर पर्यंत च्या बृहन महाराष्ट्रात एवढेच नव्हे तर न्यूयार्क पासून सिडनी पर्यंतच्या अनेकांना मराठी शिकण्याची आणि मराठीतुन शिकण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनेक मराठी शाळा ज्या नव्या विज्ञान-तंत्रज्ञानाला अवगत करून मराठी भाषेचा परीघ रुंदावतील अशा अनेक E मराठी शाळा आपणास उभाराव्या लागतील. त्यातही भाषेचे अनेक नवनवे प्रयोग करावे लागतील.

६) नवीन फॉन्ट निर्मिती करणे:- आज मराठी युनिकोड लोकप्रिय झाले असले तरी त्यात नवनवे फॉन्ट अद्याप उपलब्ध नाहीत.तेथे मराठीचा डिजीटल वेग वाढवण्यासाठी अनेकानेक फॉन्ट नव्याने घडवावे लागतील.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Ta.Sonpeth Dist.Parbhani

७)सोशल मीडियावरील नव्या संकल्पनांचा स्वीकार करणे:- सोशल मीडियावर माहितीच्या संकलनासाठी अनेक नवनव्या संकल्पना नेहमी वापरल्या जातात. उदाहरणार्थ hashtag, ट्रेण्ड, ट्रोल वगैरे.अशा संकल्पना चा उपयोग करून मराठीत नवनवीन माहितीचे संकलन करणे आवश्यक आहे. त्यासाठी वैयक्तिक तसेच संस्थात्मक योजना आखल्या जाव्यात.

८) डाटा निर्मिती करणे:- सर्वात महत्त्वाचे म्हणजे या नव्या जगाचे चलन असणारा मराठी डेटा उभा करणे.विविध माध्यमे समृद्ध करून आणि त्यादवारे विविध संकल्पना राबवून मराठी डेटा उभा करणे हे सर्वात महत्त्वाचे काम असणार आहे. जेवढा उत्तम सकस आणि समृद्ध डेटा आपण तयार करू तेवढीच आपली भाषा उद्याचे आव्हान पेलायला समर्थ होणार आहे.

खरंतर यातील अनेक गोष्टी कोरोना पूर्वीच्या काळातही आवश्यक होत्या. पण याकडे आजवर आपले दुर्लक्ष झाले.कोरोना महामारी मुळे या सगळ्यांच्या मर्यादा लख्खपणे उजेडात आल्या. त्यामुळे शेवटी ही गरजच नव्या भाषेत कृपा च्या शोधाची जननी व्हावी अशी अपेक्षा करायला हरकत नसावी.

**संदर्भसूची:**

१) नीलेश बने: कोरोना नंतरचे जग आणी मराठी दि.1 मे 2020

२) प्रल्हाद जाधव: कोरोना आणि मराठी भाषा. दै. महाराष्ट्र टाईम्स दि. 17 मे 2020.

३) मराठी विकिपीडिया

४) बीबीसी न्यूज मराठी.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# कोरोना महामारी व समाज

NOTION PRESS

Price Rs 200.00
ISBN 978-1-68554-019-7
9 781685 540197